महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – 440 022
दूरध्वनी क्र.०७१२ CIN NO. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ – २९५९३८१ ई-मेल: mahajyotingp@gmail.com

जावक क्र.महाज्योती/पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण/**१९०५**/२०२३ दि. २१/०९/२०२३

# पोलीस भरती २०२३ पूर्व प्रशिक्षण करिता चाळणी परीक्षेसाठी सूचना

१) **पोलीस भरती २०२३** पूर्व प्रशिक्षणासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी लाभार्थी निकष व अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या आधारे "**पोलीस भरती २०२३" पूर्व प्रशिक्षणाकरिता निवड परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी"** महाज्योतीने www.mahajyoti.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२) **पोलीस भरती २०२३** पूर्व प्रशिक्षणाकरीता चाळणी परीक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांचीच निवड परीक्षा घेण्यात येणार आहे.

३) परीक्षेचे स्वरूप : परीक्षा ही कॉम्पुटरच्या सहाय्याने बहुपर्यायी पद्धतीने होईल.

४) परीक्षेचे माध्यम : **मराठी**

५) परीक्षेचा वेळ : (**९० मिनिटे**)

६) **परीक्षेचा अभ्यासक्रम** :

➢ **बौद्धिक चाचणी**

१) शाब्दिक आणि गैरमौखिक तर्क २) कोडिंग-डिकोडिंग ३) Syllogism ४) रक्ताचे नाते ५) वर्गीकरण ६) उपमा ७) वर्णमाला मालिका ८) शब्दांची मांडणी ९) वाक्य व्यवस्था १०) डेटा इंटरप्रिटेशन ११) कारण प्रतिपादन १२) समस्या सोडवणे १३) दिशा चाचणी

➢ **मराठी व्याकरण**

१) व्याकरण २) मूहावरे ३) भाषेचा योग्य वापर ४) शब्दसंग्रह ५) समानार्थी आणि विरुद्धार्थी शब्द.

➢ **सामान्य ज्ञान**

१) राजकारण २) अर्थशास्त्र ३) इतिहास ४) भूगोल ५) संगणक ज्ञान ६) विज्ञान आणि तंत्रज्ञान ७) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चालू घडामोडी ८) खेळ ९) राष्ट्रीय चळवळी १०) साहित्य आणि परंपरा.

➢ **गणित**

१) LCM आणि HCF २) नफा आणि तोटा ३) वेळ आणि काम ४) टक्केवारी आणि सवलत
५) भूमिती क्षेत्रफळ आणि खंड.

७) परीक्षेसाठी वरील अभ्यासक्रमाचे एकूण १०० प्रश्न असतील, प्रत्येक प्रश्नाला १ गुण असतील असे एकूण १०० गुणांची परीक्षा असेल. कोणतेही नकारात्मक गुण असणार नाहीत.

**प्रशिक्षण निवड प्रक्रिया** :

१) पोलीस भरती २०२३ पूर्व प्रशिक्षणाकरिता चाळणी परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची विहित वेळेत परीक्षा घेण्यात येईल. परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे मेरीट यादी लावण्यात येईल.
२) जाहिरात तपशिलात नमूद केल्यानुसार संवर्ग निहाय व आरक्षण निहाय तात्पुरती निवड यादी घोषित करण्यात येईल.
३) तात्पुरत्या निवड यादीतील विद्यार्थी रुजू न झाल्यास प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात येईल.
४) विहित कालावधीत विद्यार्थी प्रशिक्षणास रुजू झाले नाही तर त्या जागेवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी देण्यात येईल.
५) परीक्षेसंदर्भात सर्व निर्णय घेण्याचा अधिकार व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचा आहे.

**टीप** :- **परीक्षेचे वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल**.

(स्वा)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व
प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर